**नेमणुक मान्यता आदेश**

1866

जा.क्र./जिपजा/शिक्षण/प्राथ-६/२०१५
कार्यालय जिल्हा परिषद जालना
दिनांक :-१९ /०५/२०१५.

प्रति,

अध्यक्ष / सचिव / मुख्याध्यापक,
मत्स्योदरी शिक्षण संस्था जालना संचलित,
पार्थ प्राथमिक शाळा,
अंकुशनगर ता.अंबड जि.जालना.

विषय :- **कर्मचारी नेमणूकीस वैयक्तिक मान्यता देणे बाबत.**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांकः पीआरई-२००६/(५११८/०६)/प्राशि-१ दिनांक २५ मे, २००९.
२. शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण २०११/(४४७/११)/(अ)/प्राशि-३ दि. ०२ मे, २०१२.
३. शासन निर्णय क्रमांकः व्हीएलएस १४१३/(१४/१३)/प्राशि-३ दि. ०६ मे, २०१३.
४. शासन निर्णय क्रमांकः आरटीई २०१३/प्र.क्र.९१/प्राशि-१, दि. २३ ऑगस्ट, २०१३.
५. आपला प्रस्ताव दिनांक १७/०६/२०१४ प्राप्त दिनांक ०२ मे, २०१५.
६. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे महा-टीईटी-२०१३ चे प्रमाणपत्र दि.०१ मे, २०१४ आसन क्रमांक ८१०५११००७४.

उपरोक्त संदर्भिय प्रस्तावास अनुसरुन शाळेच्या आवश्यकतेप्रमाणे संस्थेने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमाच्या तसेच खालील दर्शविलेल्या अटीच्या अधीन राहून वैयक्तिक मान्यता देण्यात येत आहे.

१) आपल्या शाळेतील काही वर्ग / तुकडया अनुदान प्राप्त असून त्यासाठी आवश्यक कर्मचाऱ्यांस संस्थेस शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी मान्यता दिलेली आहे. त्यापेक्षा जादा नेमलेल्या कर्मचारी यांच्या वेतनाची जबाबदारी शाळेवर / संस्थेवर राहील.

२) कर्मचारी अनुसूची मंजुरी आदेशात विहीत केलेले प्रशिक्षित प्रमाण राखण्यात यावे.

३) शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी विहित केलेल्या घडयाळी तासिके प्रमाणे वेळ सेवा करुन घेणे बाबतची जबाबदारी संस्थेवर / शाळेवर राहील.

४) महाराष्ट्र खाजगी प्राथमिक शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती नियम १९८१ च्या नियम क्रमांक ८ अन्वये) आवश्यकते मागासवर्गीयांचे प्रमाण राखलेले असून, मागासवर्गीय कर्मचारी यांच्या नेमणूका करण्याबाबतची कार्यवाही नियम क्र ८ व ९ अन्वये पूर्ण करण्यात यावी.

५) व्यवस्थापनाने केलेल्या नेमणूका या महाराष्ट्र खाजगी प्राथमिक शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती नियम १९८१ च्या अनुसूची ब मध्ये दिलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुसूची क मध्ये दिलेल्या वेतनश्रेणीनुसारच) उपलब्ध पदांच्या अधीन राहून करण्यात यावी.

६) या कार्यालयाकडून अतिरिक्त शिक्षक आपणांकडे सामावून घेण्यासाठी पाठविल्यास व त्यानुसार ते अतिरिक्त म्हणून नेमले गेल्यास नेमणूक दिलेल्या शिक्षकास २४ तासाची नोटीस देवून कमी करण्यात येईल. अशी लेखी समज त्यांना देण्यात यावी. व समज मिळाल्याबद्दलची त्यांची स्वाक्षरी आपल्या दफ्तरी ठेवावी.

७) सन २०१३-१४ वर्षात जादा मिळालेल्या वर्ग / तुकडयांसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता मिळालेली असली तरी जिल्हा नियोजन व विकास मंडळाने आर्थीक तरतूद उपलब्ध करुन दिल्यासच वेतन अदा केले जाईल. सदरील जादा तुकडया अनुदान तत्वावर आल्याचे आदेश मिळाल्यानंतरच कर्मचाऱ्यांची देयके सादर करावीत.

(कृपया मागे पहा)